# पांढऱ्या डागांवरील औषधाचे संशोधन

## 'अहाम्युन बायोसायन्सेस' कंपनीत पाच कोटी रुपयांची गुंतवणूक

सलील उरुणकर : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १० : शरीरावर पांढरे डाग असलेल्या व्यक्तींना आता लवकरच दिलासा मिळणार आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या 'व्हेन्चर सेंटर' या विज्ञान क्षेत्रातील स्टार्टअप्सच्या इन्क्युबेटरमधील 'अहाम्युन बायोसायन्सेस' कंपनीने 'व्हिटिलिगो' या त्वचारोगावरील औषधनिर्मितीसाठी महत्त्वाचे ठरणारे 'मॉलिक्युल्स' शोधले आहेत. पांढरे डाग शरीरावर पसरू नयेत, तसेच त्वचा मूळ रंग व स्वरूपात आणण्याचे काम हे औषध करणार असून त्याच्या मानवी चाचण्यांना पुढील वर्षी सुरवात होणार आहे.

'झेन्सार'चे गणेश नटराजन, 'पर्सिस्टंट'चे आनंद देशपांडे यांच्यासह काही एंजल इन्व्हेस्टर्सने या स्टार्टअपमध्ये पाच कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. स्कीन बायोलॉजिस्ट असलेल्या डॉ. पारुल गंजू आणि दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्राध्यापक कृष्णमूर्ती नटराजन हे 'अहाम्युन'चे सहसंस्थापक आहेत.



डॉ. पारुल गंजू

डॉ. पारुल म्हणाल्या, "'व्हिटिलिगो' हा रोग जीवघेणा नसला, तरी त्याविषयी आपल्या समाजामध्ये अनेक गैरसमज आहेत. शरीरामधील रोगप्रतिकार प्रणालीत (इम्युन सिस्टिम) बिघाड झाल्यामुळे तो होतो. त्यावर अद्याप पूर्ण इलाज होणारे औषध उपलब्ध नाही. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करून आम्ही त्यावर औषध तयार करत आहोत. यासाठी राज्यातील अनेक डर्माटॉलॉजिस्टबरोबर चर्चा केली असून, रुग्णांच्या गरजा काय आहेत, हेसुद्धा जाणून घेतले आहे. रुग्णांना फक्त डाग पडलेल्या ठिकाणीच औषध लावून दिलासा मिळेल, असे औषध बनविण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत.''

औषधनिर्मितीच्या चाचण्या आम्ही पुढील वर्षी पुण्यासह देशातील विविध भागांमध्ये करणार आहोत. दरम्यान, या संशोधनासाठी 'एनसीएल'कडून लायसेन्स घेतले असून, आता जून महिन्यामध्ये आम्ही पेटंटसाठी अर्ज करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.